**MHAM150022112022**

<u>फौजदारी किरकोळ अर्ज/**289/2022**</u>
संदीप सुरेशराव जहकर-वि- पो. स्टे. मोर्शी

<u>निशाणी क्रमांक १ वरील आदेश</u>
(जाहीर केल्याचा दिनांक १४.१०.२०२२)

१. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभयपक्षाचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराच्या मते त्याच्या मालकीचा <u>व्हीओ-व्ही-२१-ई</u> कंपनीचा भ्रमणध्वनी संच IMEI NO.८६३९३५०५१४१७५७७ पोलीस स्टेशन, मोर्शी यांनी अपराध क्रमांक ४५४/२०२२ मध्ये जप्त केला आहे. अर्जदार उपरोक्त भ्रमणध्वनी संचाचा मालक असुन, सदर संचाचा अंतरिम ताबा अर्जदाराने मागीतला आहे. तो न्यायालयाने घालुन दिलेल्या अटींची पुर्तता करण्यास तयार असुन, नमूद मोबाईल संचाचा दुरुपयोग करणार नाही, अशी हमी देत आहे. तपास अधिका-याने नमूद भ्रमणध्वनी संच जुगारा संदर्भातील अपराधामध्ये आरोपी कडून जप्त केल्याचे कथन केले आहे. सदर संचाचा ताबा आरोपीला दिल्यास, तो परत जुगाराच्या अपराधामध्ये वापरण्याची भिती त्यांनी दर्शविली आहे.

२. अर्जदाराने जप्त भ्रमणध्वनी संचा बाबत खरेदी पावती अभिलेखावर दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता, नमूद संच अर्जदाराने खरेदी केल्याचे प्रथमदर्शनी अधोरेखीत होते. अर्जदार तपास यंत्रणेला सहकार्य करण्यास तयार असुन, नमूद संचाचा कोणत्याही प्रकारे दुरुपयोग करणार नाही, याची हमी देत आहे. जप्त मालमत्ता जप्ती मध्ये अधिक काळ ठेवल्यास त्यामध्ये बिघाड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वरील चर्चेच्या अनुषंगाने व सुंदरभाई अंबालाल देसाई -विरुध्द- गुजराथ सरकार २००३ अे.आय. आर. सर्वोच्च न्यायालय ६३८ या प्रकरणामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने नोंदविलेल्या निरीक्षणाच्या अनुषंगाने अर्जदारास जप्त मालमत्तेचा अंतरिम ताबा देणे न्याय सुसंगत होईल. अन्वेषण अधिका-याने जप्त मालमत्तेच्या गैरवापरा संदर्भात व्यक्त केलेल्या आशंकेची काळजी घेण्याकरीता, अर्जदारावर उचित अटी लादणे इष्ट ठरेल.

करीता खालील आदेश.

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. जप्त मुददेमाल <u>व्हीओ-व्ही-२१-ई</u> कंपनीचा भ्रमणध्वनी संच IMEI NO. ८६३९३५०५१४१७५७७ चा अंतरिम ताबा अर्जदारास त्याने रुपये ५,०००/- चे बंधपत्रावर देण्यात यावे. सदरचे बंधपत्र हे पोलीस स्टेशन अधिकारी, मोर्शी यांचे समक्ष दाखल करावे.

३. अर्जदाराने उपरोक्त मालमत्तेचा कोणत्याही प्रकारे दुरुपयोग करु नये.

४. अर्जदाराने जप्त भ्रमणध्वनी संचाच्या नैसर्गिकते मध्ये कोणत्याही प्रकारे बदल करु नये अथवा जप्त मालमत्तेचे अभिहस्तांतरण करु नये.

५. अर्जदाराने जप्त मुद्देमाल जेव्हा केव्हा न्यायालय आदेशित करेल, त्यावेळी न्यायालया समक्ष सादर करावा.

६. पोलीस स्टेशन, मोर्शी यांना निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी मुद्देमाल सुपुर्द करण्यापूर्वी अर्जदाराचे खर्चाने मुद्देमालाचे छायाचित्र काढुन त्याची प्रत व पंचनाम्याची प्रत प्रस्तुत खटल्यात दाखल करावी.

७. पोलीस स्टेशन अधिकारी, मोर्शी यांनी अर्जदाराने दाखल केलेले बंधपत्र प्रस्तुत गुन्हयातील दोषारोपपत्रा सोबत न्यायालयात दाखल करावे.

RAJESH BABURAO KHANDARE

Digitally signed by RAJESH BABURAO KHANDARE
Date: 2022.10.15 10:43:00 +0530

(राजेश बा. खंदारे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं.१,
मोर्शी.

दिनांक १४.१०.२०२२